28-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 5/27/2025 10:00 PM Page 1

स्मार्ट गोवा अंतर्गत राज्यात हरित प्रकल्प राबवणार

- मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत
- न्हावेली साखळीत प्रदूषण मुक्त इथेनॉल प्रकल्पची पायाभरणी

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २७ : ग्रीनर गोवा, स्ट्राँगर गोवा व स्मार्टर गोवा या संकल्पनेखाली गोव्यात विविध हरित प्रकल्प आणण्यासाठी गोवा सरकार पुढाकार घेत आहे. त्यातीलच एक पर्यावरणपूरक व प्रदुषणमुक्त असा इथानॉल निर्मिती प्लांट न्हावेली गावात येत असून हा प्रकल्प न्हावेली गावातील कृषी क्षेत्रालाही पाठबळ देणार आहे. तसेच स्थानिकांना रोजगाराची संधीही देणार. उस व इतर पिकांपासून इथानॉल निर्मित करून राहिलेला घटक हा गुरांसाठी खाद्य म्हणून पुरविला जाणार. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे प्रदुषण गावात होणार नाही. अशा प्रकल्पाला गावातील लोकांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी न्हावेली साखळी येथे केले.

न्हावेली साखळी : इथानॉल प्लांट प्रकल्पाची कोनशील अनावरण करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत गोपाळ सुर्लकर, रोहिदास कानसेकर, जॉबी जॉर्ज, कल्पना गावस व इतर पंचसदस्य.

सेंट्रल बायोफ्युअल लिमिटेड या कंपनीतर्फे न्हावेली साखळी येथे साकारण्यात येणाऱ्या गोव्यातील पहिल्या इथानॉल प्लांटची पायाभरणी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते करण्यात आली. या सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी व्यासपीठावर, जिल्हा पंचायत सदस्य गोपाळ सुर्लकर, न्हावेलीचे सरपंच रोहिदास कानसेकल, उपसरपंचा कल्पना गावस, सेंट्रल बायोफ्युअल लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक जॉबी जॉर्ज यांची उपस्थिती होती.

यापूर्वी न्हावेलीत स्थानप झालेल्या कंपनीकडून केवळ प्रदुषणच नशिबी आले आहे. व त्यात ९९ टक्के कामगार हे बाहेरचे आहेत. बायोफ्युअल लिमिटेड कंपनी हि प्रदुषणमुक्त असणार तर या कंपनीत ९० टक्के कामगार हे स्थानिक गोवेकर असणार. हि कंपनी येथे उस व इतर पिकांपासून इथानॉल तयार करणार. यात कामाला लागणाऱ्या गावातील लोकांसमोर मोठी संधी असून कामाला लागताच आताच कायम करण्याचा हट्ट कोणी धरू नये. स्थानिकांना रोजगार व प्रदुषणापासून मुक्ती या तत्वांवर हि कंपनी आपणावर विश्वास ठेऊन या गावात आली आहे. त्यांच्या कामाला पंचायतीसह सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी केले.

सेंट्रल बायोफ्युएल्स लिमिटेड ३०० किलो लिटर प्रतिदिन धान्य-आधारित इथेनॉल उत्पादन करणार असून ८० टक्के क्षमता वापरण्याचे लक्ष्य आहे. भारत सरकारने स्वच्छ इंधनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि जीवाश्म इंधनांवरील अवलंबन कमी करण्यासाठी सुरू केलेल्या इथेनॉल ब्लेंडिंग प्रोग्राम (ईबीपी) चा भाग म्हणून उत्पादित इथेनॉल तेल विपणन कंपन्यांना (ओएमसी) पुरवले जाईल. या प्रकल्पामुळे स्थानिक रहिवाशांसाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील. स्थानिक शेतकऱ्यांकडून थेट धान्य खरेदी केले जाईल, ज्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत योगदान मिळेल. डिस्टिलर धान्यांसारख्या उप-उत्पादनांचा वापर पौष्टिक पशुखाद्य म्हणून केला जाईल, असे यावेळी व्यवस्थापकीय संचालक जॉबी जॉर्ज यांनी सांगितले.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते समई प्रज्वलित करून व कोनशील अनावरण करून या प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. स्वागत व प्रास्ताविक जॉबी जॉर्ज यांनी केले. सूत्रसंचालन समृध्दी गणपुले यांनी केले, तर आभार प्रिन्स यांनी मानले.

पान १ वरून

कळंगुटमध्ये बनावट चॉकलेटचा मोठा साठा जप्त

मिळाल्यानंतर सोमवारी रात्री ९.३० वाजता त्याला रंगेहाथ पकडण्यात आले, अशी माहिती एका एफडीए अधिकाऱ्याने दिली.
छाप्यादरम्यान संबंधित पुरवठादार कोणताही वैध परवाना सादर करू शकला नाही. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ही उत्पादने गुजरात, राजस्थान आणि इतर उत्तर भारतीय राज्यांत तयार होऊन गोव्यात आणली जात होती आणि कळंगुट येथे त्यांचे पुनपकेजिंग केले जात होते. संशयित आरोपी रात्रीच पॅकिंगसाठी येत असे आणि सकाळी ठिकाण सोडत असे, त्यामुळे त्याला पकडणे कठीण झाले होते.
त्याने केवळ बार्देश तालुक्यातच नव्हे तर गोव्यातील इतरही भागांत ही बनावट उत्पादने पुरवली असल्याचा आम्हाला संशय आहे. याठिकाणी वीज नसल्यामुळे काही उत्पादने वितळली होती, असेही अधिकाऱ्यांनी नमूद केले.सध्या नमुन्यांची तपासणी प्रयोगशाळेत सुरू असून त्याच्या अहवालानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

१०७ शेतकऱ्यांच्या भातपिकाचे नुकसान

पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शक्य तितकी आर्थिक मदत दिली जाईल. यापूर्वीही अशा प्रकारच्या नुकसानग्रस्त भागांतील शेतकऱ्यांना भरपाई देण्यात आलेली आहे.

शांतादुर्गा कलाकेंद्र धारगळ संस्थेच्या अध्यक्षपदी गजानन नाईक

पेडणे – शांतादुर्गा कला केंद्र धारगळ संस्थेच्या नूतन कार्यकारणीचे पदाधिकारी. पेडणे – शांतादुर्गा कला केंद्र धारगळ संस्थेच्या नूतन कार्यकारणीचे पदाधिकारी.

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २७ : श्री शांतादुर्गा कलाकेंद्र धारगळ या संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष प्रकाश धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी पुढील तीन वर्षासाठी खालील नूतन कार्यकारणीची बिनविरोध निवड करण्यात आली.

निवडण्यात आलेले संस्थेचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे –

अध्यक्ष गजानन नाईक, उपाध्यक्ष हरी साळगावकर, सचिव संदेश कारापुरकर, सहसचिव शिवराम नार्वेकर, खजिनदार ज्ञानेश्वर कारापुरकर, उपखजिनदार साईनाथ कोरगावकर, सल्लगार सुरेश कारापुरकर व सतीश धुमाळ, सदस्य कमलेश ठाकूर, प्रकाश धुमाळ, अजित नाईक, ज्ञानेश्वर नाईक व संभाजी ठाकूर यांची निवड करण्यात आली.

यावेळी झालेल्या चर्चेवेळी आजपर्यंतच्या कार्यक्रमावर उहापोह करण्यात आला. तसेच पुढील करण्यात येणाऱ्या कार्यक्रमावर चर्चा झाली. त्यात कला अकादमीच्या अखिल गोवा पातळीवरील भजनी स्पर्धेत सहभागी होणे. नाट्य स्पर्धेत भाग घेणे. गोव्यात ज्या ज्या संस्था भजन, गवळण, अभंग गायन स्पर्धा आयोजित करतात त्यात भाग घेणे. मंदिरामध्ये व इतर ठिकाणी भजनास संस्थेला निमंत्रीत केल्यास भजनात सहभागी होणे. संस्थेतर्फे सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा आयोजित करणे, संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त त्यावेळी रूपरेषा ठरविणे व इतर विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

प्रारंभी अध्यक्ष प्रकाश धुमाळ यांनी उपस्थित पदाधिकारी व सभासदांचे स्वागत केले. व बैठकीत मांडण्यात येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेण्याचे सांगितले. यावेळी सचिव अजित नाईक यांनी मागील सभेचा इतिवृत्तांताचे वाचन केले. व जमाखर्च सादर केला. यावेळी झालेल्या विविध विषयावर उपस्थित सभासदांनी योग्य कार्यक्रम कसे करता येईल यावर आपली मते मांडली. सभेनंतर सचिव अजित नाईक यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सावईवेरेत 'जागोर उत्सव'चे उत्तमरित्या सादरीकरण

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. २७ : सावईवेरे येथील जैताचो वांगडी सख्याहरी या संस्थेतर्फे कला आणि संस्कृती खाते गोवा सरकार यांच्या सहकार्याने कला उत्सव २०२५ अंतर्गत जागोर उत्सवाचे प्रथमच सावईवेरे येथे उत्तमरित्या आयोजन करण्यात आले.

सावईवेरे येथील ग्रामपंचायत वाचनालयाच्या सभागृहात संपन्न झालेल्या उद्घाटन सोहळ्यास व्यासपीठावर कृषी मंत्री रवी नाईक, सरपंच शोभा पेरणी, लेखक डॉ. समर्थ बोरकर, पंच सदस्य अक्षय नाईक, अब्दुल बशीर, अग्निशामक केंद्र अधिकारी सुशील मोरजकर व संस्थेचे अध्यक्ष दिनेश नाईक उपस्थित होते.

मंत्री रवी नाईक म्हणाले की कुळ व मुंडकार कायदा अंतर्गत असलेली काही प्रलंबित प्रकरणे निकाली लावण्यासाठी मी स्वतः यापूर्वी प्रयत्न केलेले आहेत. कूळ मुंडकारांना न्याय देण्यासाठी प्रलंबित असलेले खटले निकालात आणण्यासाठी प्रशासनाबरोबरच सामाजिक कार्यकर्त्यांनी व पत्रकारांनी देखील प्रयत्न करावेत.जागोर गोव्यातील एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक व धार्मिक परंपरा असलेली पारंपरिक लोककला असून तिचे संवर्धन होण्यासाठी अशाप्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी संस्थेचे भरभरून कौतुक केले.जागोर लोकांना एकत्र येऊन आनंद साजरा करण्याची एक संधी उपलब्ध करून देते. ज्यामुळे सामाजिक संबंध मजबूत होतात.

याप्रसंगी बोलताना डॉ. समर्थ बोरकर म्हणाले की, ज्या भूमीत आम्ही जन्म घेतला त्या भूमीला आम्ही सामाजिक देणे लाभतो याची जाण ठेवीत या संस्थेचे अध्यक्ष दिनेश नाईक हे धडाडीचे व समाजाशी एकरूप असल्याने सामाजिक जबाबदारी ओळखून ते भरपूर मेहनत घेत आहेत.आपण आधुनिकतेकडे झपाट्याने वळत आहोत. आधुनिकतेबरोबरच गोव्यातील पारंपारिक जागोर या लोककलेचा लिखित स्वरूपात दस्ताऐवज उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे.

याप्रसंगी शोभा पेरणी यांनी सावईवेऱ्यात प्रथमच जागोर उत्सवाचे आयोजन करून गावकऱ्यांना जागोर ही पारंपरिक लोककला बघण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे कौतुक केले.

सर्वप्रथम दिनेश नाईक यांनी प्रास्ताविक केले.मंत्री रवी नाईक व सर्व मान्यवरांच्या हस्ते झाडाच्या रोपट्याला पाणी देऊन उद्घाटन करण्यात आले.मंत्री रवी नाईक यांच्या हस्ते डॉ. सम्राट बोरकर, अब्दुल बशीर, अग्निशामक केंद्र अधिकारी सुशील मोरजकर, दीपक गावणेकर, अनंत वेलकासकर व गौतम नाईक यांचा सन्मान करण्यात आला.

सूत्रनिवेदन कविता गावडे यांनी केले तर शेवटी यांनी दिनेश नाईक यांनी आभार मानले. यांनतर सरस्वती कला मंडळ, केळबाय कुर्टी यांच्यातर्फे जागोराचे उत्तम सादरीकरण झाले.

PUBLIC NOTICE

General public is hereby informed that my Client intends to purchase from **SMT. SUNAYANA SUNIL TARI alias SUNAYNA SUNIL TARI**, wife of shri. Sunil ShrikantTari, age 58 years, Housewife, Indian National, Holding of Adhaar Card No. 7227 3671 7709, Holding of Pan Card No. AJQPT5956M, and **SHRI. SUNIL SHRIKANT TARI,** son of ShrikantTari, age 60 years, Service, Indian National, Holding of Adhaar Card No. 6910 9614 7608, Holding of Pan Card No. AJNPT0821E, both residence of H.No. E/81/5/B, Near Petrol Pump Gopal Krishna Nagar, Sircaim, Bardez North Goa, an immovable property Surveyed under No. 103/1-A-R,situated in village Assonora, Taluka Bardez, Sub-District Bardez, District North Goa, described in detail in the schedule hereinafter.

Schedule

THAT SAID PROPERTY known as "**UNCULTIVATED HILLY LAND**" known as **UDDENTICHO MATHO**", bearing survey no.103 sub division 1-A-R,admeasuring an area of 300 sq. mts, situated in village Assonora, within the limits of village Panchayat Assonora, Taluka Bardez, Sub-District Bardez, District North Goa, State of Goa, which is not describe in land description registration office of Bicholim nor in the land revenue office of Mapusa. and that the said property bounded as under; **On the East:-** By property bearing survey no.103/1. **On the North:-** By property bearing survey no.103/1. **On the South:-** By property bearing survey no. 103/1-D-Q. **On the West:-** By property bearing survey no.103/1.

Any personals, firm, company, Bank, Financial Institution etc having any right or claim to the immovable property referred above shall lodge their objection/s with the undersigned along with the supportive document/s, **within 15 days** from the date of publication of this notice, failing which it will be assumed that the objections or rights if any are waived by such person/s and my client shall proceed with the transactions as if the said immovable property is deemed to be free from any encumbrances, claims, charges, rights etc.

Date-27/05/25
Mapusa-Goa

Sd/-
(R. VAIGANKAR)
Advocate
Mapusa Height, Off. No.8, Fourth Floor, Near Court, Mapusa, Bardez- Goa.
Mb. No. 9765966818

Sandeep Ads

गोवा सरकार
वीज खाते
कार्यकारी अभियंता कार्यालय
स्थापत्य विभाग-१५ (उत्तर), पणजी-गोवा
आयडीसी बिल्डींग, ६ वा मजला, पाटो प्लाझा, पणजी-गोवा

निविदा सूचना

(फक्त ई-निविदा प्रणालीने)

या विबागाने निविदा क्र. ०७(२५-२६) आणि ०८(२५-२६) प्रसिद्ध केल्या आहेत व इच्छुक फर्म्सना त्यात भाग घेण्यासाठी त्या **https://eprocure.goa.gov.in** या संकेतस्थळावर प्रकाशित केल्या आहेत.

डीआय/एडीव्हीटी/४९५/२०२५

यूनियन बैंक ऑफ इंडिया / **Union Bank of India** (A Government of India Undertaking)

क्षेत्रीय कार्यालय, 2 रा मजला, एलआयसी बिल्डींग, ईडीसी कॉम्प्लेक्स, पाटो, पणजी, गोवा
दूर.क्र. : 0832-2437971/72/73/74 (विस्तार-23)

वाहनांच्या विक्रीसाठी निविदा सूचना

युनियन बँक ऑफ इंडियाच्या ताब्यात असलेल्या वाहनांच्या ई-लिलावाद्वारे विक्रीसाठी अर्ज मागवले आहेत. वाहने आणि जंगम मालमत्तांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

शाखा नाव व संपर्क क्रमांक :	वाहनाचा तपशील	नोंदणीचा प्रकार	नोंदणी क्रमांक	नोंदणी तारीख	राखीव किंमत (रु.)	ब.र.ठेव (रु.)
वेर्णा 9012227536	टाटा पंच एसीसी **1.2** पी बीएस **6** एमटी	खाजगी	जीए-**08**-एए-**3342**	**17.09.2022**	**5,25,000.00**	**52,500.00**

विक्रीच्या अटी व शर्ती :(1) सदर लिलाव 13.06.2025 रोजी सकाळी 11.00 वा. जसे आहे जेथे आहे व जे आहे जे काही आहे या तत्वावर घेतला जाईल. **(2)** इच्छुक खरेदीदार-बोलीदारांनी **12.06.2025** रोजी संध्या. **5.00** वा त्यापूर्वी एनईएफटी/आरटीजीएस द्वारे खाते क्र. **378401980050000** व आयएफएससी यूबीआयएन**0537845** मध्ये एनईएफटी/आरटीजीएस किंवा डिमांड ड्राफ्ट द्वारे बयाणा रक्कम ठेव **(ईएमडी) : रु. 52,500.00, खाते क्र. 1210219800050000, आयएफएससी कोड यूबीआयएन 0912107** जमा करावी. **(3)** यशस्वी बोलीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीने जमा केलेली ईएमडी वजा करून विक्रीची **100%** रक्कम लिलावाच्या सात दिवसांच्या आत म्हणजे **19.06.2025** रोजी वा त्यापूर्वी जमा करावी. **(4) ई-लिलाव 13.06.2025 रोजी सकाळी 11.00 ते संध्या. 5.00** या वेळात **(10 मिनिटांच्या अमर्यादित स्वयंचलित विस्तारासह) https://www.bankeauctions.com** या पोर्टलद्वारे घेतला जाईल. इच्छुक बोलीदारांनी त्यांची नावे **https://www.bankeauctions.com** या संकेतस्थळावर नोंदवणे व मे. सी-वन इंडिया लि. कडून मोफत युजर आयडी व पासवर्ड घेणे आवश्यक आहे. **(संपर्क अधिकारी श्री. भाविक आर. पंड्या मोबा. क्र.-8866682937, हेल्प लाईन क्र. 729198112425/26, ईमेल : Maharashtra@c1india.com). (5)** त्यासाठी कोणतेही कारण न देता लिलाव रद्द करण्याचा किंवा सर्वोच्च बोली न स्वीकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे. **(6)** त्यापुढील बोली अगोदरच्या बोली पेक्षा किंवा सर्व वाहनांसाठी ठरवलेल्या राखीव किमतीपेक्षा **रु. 5,000/-** हून कमी नसावी. **(7)** वाहन विक्री किंमतीची रक्कम भरल्यावर/जमा केल्याची खात्री झाल्यानंतर जसे आहे जेथे आहे या स्थितीत त्या वाहनाची डिलीव्हरी दिली जाईल. **(8)** अयशस्वी बोलीदार ज्यांनी ईएमडी जमा केली आहे ते विक्री संमत झाल्यावर व्याजाशिवाय सदर जमा रक्कम परत मिळण्यास पात्र राहतील. **(9)** तारण ठेवलेल्या वाहनातील कोणत्याही त्रुटीसाठी बँक जबाबदार राहणार नाही वा त्यांचे दायित्व असणार नाही.**(10)** देय रस्ता कर/पॅसेंजर कर इ. याची माहिती बोलीदारांनी आरटीओ कडून घ्यावी व लिलावात भाग घेण्यापूर्वी देय पार्किंग चार्जेसचा भरणा करावा. आरटीओ/विमा कंपनी/कोणतेही अन्य प्राधिकरण यांना कोणतेही देय असल्यास त्यांचा खर्च बोलीदारास सोसावा लागेल. **(11)** बोली रकमेची उर्वरित रक्कम **05.02.2025** रोजी वा त्यापूर्वी जमा करण्यास यशस्वी बोलीदारास अपयश आल्यास त्याने जमा केलेली ईएमडी बँकेद्वारे जप्त केली जाईल व स्वीकारलेली बोली स्वयंचलितपणे रद्द होईल. **(12)** बोलीदारांस, त्यांची इच्छा असल्यास, ते पूर्ववेळ घेऊन आठवड्यातील कामाच्या दिवशी विकावयाच्या जंगम मालमत्तांची पाहणी करू शकतील.

दिनांक : 27-05-2025
ठिकाण : फोंडा, गोवा

सही/-
प्राधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

CHANGE OF NAME

I, **SMITA SUNIL QUITLECAR**, r/o H. No. 68/14, KASAR WADA, KHORLIM, MAPUSA, NORTH GOA, GOA, 403507, Hereby change my name from **SUMITA NANODCAR** to **SMITA SUNIL QUITLECAR.** Hereinafter in all my dealings and documents, I will be known as **SMITA SUNIL QUITLECAR.**

यूनियन बैंक ऑफ इंडिया / **Union Bank of India** (A Government of India Undertaking)

याक्षेत्रीय कार्यालय,2 रा मजला, एलआयसी बिल्डींग, ईडीसी कॉम्प्लेक्स, पाटो-पणजी, गोवा. दूर.क्र. : 2437971/ 72 /73 /74

स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) मधील तरतुदींखाली स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे तमाम लोक आणि खासकरून कर्जदार व हमीदार यांना नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण टाकलेल्या/ भार असलेल्या व युनियन बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांनी रचनात्मक/ भौतिक कब्जा केला आहे त्या खाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्ता खाली दिलेल्या कर्जदार व हमीदारांकडून युनियन बँक ऑफ इंडियाला खाली दिलेल्या देय रकमेची वसुली करण्याकरिता **'जसे आहे जेथे आहे', 'जे आहे जे काही आहे,' व 'तेथे जे जे काही आहे'** या तत्वावर खाली दिलेल्या तारखेस विकल्या जातील. राखीव किंमत व बयाणा रक्कम ठेव खाली दिल्यानुसार आहे :

ई-लिलाव संकेतस्थळ : https://baanknet.com.
ई-लिलावाची तारीख व वेळ : 13-06-2025. दुपारी 12.00 ते संध्या. 5.00 (10 मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह).
ताब्याचा प्रकार : भौतिक. सुरक्षित धनकोस ज्ञात भार : कोणतेही अन्य भार माहित नाहीत.
त्यापुढील बोली : सर्वोच्च बोलीच्या किंवा लगेचच्या मागील बोलीच्या रु. 1,00,000.00/- (रु. एक लाख फक्त) पेक्षा कमी असू नये, जसे प्रकरण असेल त्यानुसार, रु. 1,00,000.00/- (रु. एक लाख फक्त) या बहु वाढ मूल्यासह.
विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया www.unionbankofindia.c या संकेतस्थळावर पुरविलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

शाखेचे नाव व पत्ता	विद्यानगर शाखा, जुन्या चौगुले कॉलेजजवळ, घोगळ, मडगाव, गोवा-403601 दूर.क्र. 0832-2750373
कर्जदार व हमीदाराचे नाव	**1. मे. अरकांजो कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि., द्वारा नोरोन्हा ऑटोमोबाईल्स,** गाळा क्र. **1**, कुंदे पेट्रोल पंपामागे, मडगाव, गोवा **403601. 2. श्रीमती पिएदाद नोरोन्हा,** घर क्र. **1061** बोर्डा, मडगाव, गोवा **403601. 3. श्री. अरविन नोरोन्हा,** घर क्र. **1061** बोर्डा, मडगाव, गोवा **403601.4. कु. ॲलिस नोरोन्हा,** घर क्र. **1061** बोर्डा, मडगाव, गोवा **403601.**

दि. 06-11-2024 रोजी देय रक्कम : 11,01,16,954.47 (रु. अकरा कोटी एक लाख सोळा हजार नऊशे चोपन्न व पैसे सत्तेचाळीस फक्त) अधिक त्यावरील त्यापुढील व्याज, किमती व इतर खर्च.

मालमत्ता वर्णन : मालमत्ता क्र. 01 : गोवा राज्यातील दक्षिण गोवा जिल्ह्यातील सालसेत तालुक्यातील मडगाव नगरपालिका क्षेत्रात बोर्डा येथे असलेल्या डिपॉयबाटा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमीन जुमल्याच्या मालमत्तेचा भाग असलेला प्लॉट ज्यावर नगरपालिका घर क्र. **1061** असलेल्या बंगल्याच्या बांधकामासह **4006.65** चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या प्लॉट क्र. **5** चा संपूर्ण भाग जी जमीन दक्षिण गोवा जिल्ह्याच्या मडगाव शहर सर्वेक्षणाच्या पीटी शीट क्र. **174** च्या चलता क्र. **6** (भाग) खाली सर्वेक्षित व मात्रिज क्र. **684** खाली तालुका महसूल कार्यालयात नोंदवेलेला आणि नवीन मालिकेच्या क्र. **4915** व **4916** खाली भू नोंदणी कार्यालयात वर्णिलेली आहे.
राखीव किंमत : रु. 8,64,00,000.00/- (रु. आठ कोटी चौसष्ट लाख फक्त)
बयाणा रक्कम ठेव : रु. 86,40,000/- (रु. शहाएंशी लाख चाळीस हजार फक्त) ई-लिलावाचे सुरवातीस वा त्यापूर्वी.

मालमत्ता क्र. 02 : मात्रिज क्र. **693** खाली तालुका महसूल कार्यालयात नोंदवलेली व नवीन मालिकेच्या क्र. **35642** खाली सालसेत भू नोंदणी कार्यालयात वर्णिलेली व मडगाव नगरपालिका हद्दीत विद्यानगर, मडगाव, सालसेत, दक्षिण गोवा, गोवा **403602** येथे असलेल्या पीटी शीट क्र. **173** च्या चलता क्र. **34** मध्ये **आंद्रे शीर** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमिनीचा **1675.00** चौ.मी. क्षेत्रफळाचा संपूर्ण प्लॉट.
राखीव किंमत : रु. 3,30,00,000.00/- (रु. तीन कोटी तीस लाख फक्त)
बयाणा रक्कम ठेव : रु. 33,00,000/- (रु. तेहतीस लाख फक्त) ई-लिलावाचे सुरवातीस वा त्यापूर्वी.

शाखेचे नाव व पत्ता	पणजी शाखा, हॉटेल अवंती बिल्डींग, रुआ दी ओरेम, पणजी, गोवा 403001 दूर.क्र. 0832 2228820
कर्जदार व हमीदाराचे नाव	**1. श्रीमती व्हायोला त्रिमुर्ती करपे,** फ्लॅट क्र. **306**, बी बिल्डींग, शॅलोन अपार्टमेंट, मिरामार, पणजी **403001. 2. श्री. त्रिमुर्ती किशोरलाल करपे,** फ्लॅट क्र. **306**, बी बिल्डींग, शॅलोन अपार्टमेंट, मिरामा, पणजी **403001**.

देय रक्कम : रु. 51,27,306.98/- (रु. एक्कावन्न लाख सत्तावीस हजार तीनशे सहा व पैसे अठ्ठ्याण्णव फक्त) (एनपीए तारखेस देय) अधिक एनपीए तारखेपासून कंत्राटी दराने त्यावरील व्याज व कायदेशीर खर्च.

मालमत्ता वर्णन : तिसवाडी तालुका, गोवा येथील मोरोंबी दी ग्रांद, मेरशी या गावातील बोना या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मोठ्या मालमत्तेचा भाग असलेल्या मोरोंबी द ग्रांद गावाच्या सर्व्हे क्र. **261/2** खाली सर्वेक्षित प्लॉट क्र. **261/2**-सी यावर स्लील्ट कार पार्किंगसह पूनम शांती पॅराडाईज इमारतीच्या ब्लॉक बी मधील दुसऱ्या मजल्यावरील त्याच्या अविभाजित प्रमाणित हिश्यासह बी.यू.ए.च्या **190** चौ.मी. क्षेत्रफळाचा फ्लॅट क्र. बी-**202**.
राखीव किंमत : रु. 51,63,000/- (रु. एक्कावन्न लाख त्रेसष्ट हजार फक्त)
बयाणा रक्कम ठेव : रु. 5,16,300/- (रु. पाच लाख सोळा हजार तीनशे फक्त) ई-लिलावाचे सुरवातीस वा त्यापूर्वी.

दिनांक : 27.05.2025
ठिकाण : पणजी, गोवा

प्राधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) नियम 9(1) नियम 6(2) खाली 30/15 दिवसांची सांविधिक विक्री सूचना

ही नोटीस वर दिलेल्या तारखेला **ई-लिलाव विक्री** होत असल्याबद्दल सदर कर्जाचे कर्जदार व हमीदार यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, **2002** च्या नियम **8(6)** नियम **6(2)**व नियम **9(1)** खालील तुरतुदींखाली नोटीस समजावी. इच्छुक बोलीदारांना सल्ला आहे की त्यांनी **ई-लिलाव विक्री** प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी व त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी **https://baanknet.com** आणि **www.unionbankofindia.co.in tenders** या संकेतस्थळाला भेट द्यावी.

ADMINISTRATION OFFICE OF THE COMUNIDADES OF NORTH ZONE, Comunidade Bldg-Opp-Civil Court, Altinho, Mapusa-Goa.
NOTICE OF AUCTION OF TIVIM COMUNIDADE PLOT

(Under Art.334 of the Code of Comunidades)

It is hereby announced that on 17th June, 2025 at 3.30 p.m. in this office, the public auction for leasing of plot will be held with respect to the plot belonging to the Comunidade of Tivim of Bardez-Taluka, situated at Tivim village. (details of plot and applicant are given below)
Name of Applicant: Smt. Shilpa Shripad Nagvekar,
File No. 1-01-2024-ACNZ/2024
Survey No. 281/1, Plot No.96, Plot Area 330 sq.mtrs.
Min Amount Lease Bidding Rs. 1,65,000/-

CONDITION FOR THE AUCTION

(1) Every contesting bidder other than applicant should deposit in cash or in Demand Draft (DD) in the Office of Administrator of Comunidades of North Zone, Mapusa, Bardez-Goa, in cash an amount equivalent to five times of the initial minimum amount lease bid as fixed above. The said EMD amount should deposited in this office on the previous day of auction between 10.00 a.m. to 12.noon and only those persons who have deposited such amounts a list thereof will be displayed in this office notice board by 1 p.m. on the same day alongwith the cost incurred by the applicants during the process of the file till the day of auction of the plot. Only those who fulfill the above condition laid down in this notice shall be allowed to participate in auction on the appointed date and time subject to the other conditions.
(2) The contesting Bidders other than the applicants are also required to produce an Affidavit sworn stating that the contesting Bidders, the contesting Bidder's spouse and the minor children do not own any house or land within the state of Goa alongwith valid residential status of proof of fifteen years residency issued by the competent authority.
(3) The bidders participating for the auction should obtain NOC from the concerned Comunidade 3 (three) days before the auction and submit the same to the office of the Administrator of Comunidades North Zone, Mapusa.
(4) In the event of the applicants winning the bids one year's lease rent is to be immediately deposited in the Administrator's office.
(5) On the day of the auction if there are no bidders then the plots will stand allotted to the applicant on payment of one year's lease rent to the office of Administrator of Comunidades of North Zone, Mapusa.
(6) The persons other than the applicant winning bid should deposit one year's lease rent and also double the costs incurred by the applicant for processing the file on the spot. The EMD in such a case will be adjusted against the above payments. In case successful bidders fails to deposit one year's lease rent and double the costs incurred by the applicants for processing the file on the spot in such a case the EMD deposited shall be forfeited. In such case the second highest bidders and so on will be considered for acceptance of their bids and fulfillment of payment conditions as laid down. Only cash payments shall be accepted. Also such defaulters shall not be allowed to participate in any future auctions of Comunidade plots.
(7) The Administrator of Comunidades of North Zone, Mapusa, Bardez-Goa, reserves the right to accept or reject any bids without assigning any reasons and the decision of the Administrator shall be final in all matters.

Mapusa, 16th May, 2025

Sd/- **(Naresh N. Salgaonkar)**
Acting Secretary

Seen
Sd/- **(Pandurang Gad)**
Administrator of Comunidades of North Zone.

मोरजीत नांगर पूजेने शेतीकामांना सुरुवात

मोरजी : नागर पूजा विधी करताना शेतकरी.

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २७ : मोरजी पंचायत क्षेत्रात शेकडो वर्षांपूर्वीची परंपरा असलेल्या विधी आजही मोठ्या उत्साहात साजरा केल्या जातात. २६ रोजी मोरजाई देवस्थान समिती महाजन तर्फे परब नांगर पूजेचे आयोजन मळेकर वाडा मोरर्जी या शेतामध्ये करण्यात आले.

पुरोहित उदय गाडगीळ त्यांच्या सहकार्यामार्फत विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी श्री मोरजाई देवस्थान समितीचे अध्यक्ष रामनाथ शेटगावकर, न्हानू शेटगावकर, गणेश शेटगावकर, रघुनाथ शेटगावकर, दादी शेटगावकर, नीलेश शेटगावकर, माजी उपसरपंच अमित शेटगावकर, पारंपारिक पद्धतीने शेती नांगरणी करणारे रवी शेटगावकर, सखाराम परब, विजू शेटगावकर, ज्येष्ठ नागरिक रामनाथ पवार आदी नागरिक मानकरी ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री मोरजाई देवस्थान समितीमार्फत दरवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी भात शेती नांगरण्यापूर्वी अगोदर विध